रे.मु.नंबर 247/2012 मधील निशाणी 34 चे अर्जावरील आदेश.

धनंजय बनसोडे वि. मारुती बनसोडे.

वादीने प्रस्तुतचा अर्ज दावा दुरुस्ती बाबत दिलेला आहे.

अर्ज कथने संक्षिप्तेत खालील प्रमाणे :-

2. वादी नंबर 1, 2 व 4 यांना शिवाजी नांवाचा भाऊ आहे व तो वादी नंबर 3 सुमन व प्रतिवादी नंबर 1 यांचा जनक मुलगा आहे. दावा दाखल करतेवेळी तो अज्ञान होता त्यामुळे चुकुन त्याचे नांव दाव्यात घालण्याचे राहुन गेले आहे. दावा मिळकतीत त्याचा हक्क व हिस्सा आहे. त्यास वादी म्हणून समाविष्ट करणे गरजेचे आहे. सबब दाव्यात वादी नंबर 5 म्हणून शिवाजी मारुती बनसोडे यांस ज्यादा समाविष्ट करावेत व वंशावळीत अश्विनी या शब्दानंतर वादी नंबर 5 शिवाजी असा उल्लेख करण्याबाबत परवानगी मिळावी. तसेच दावा कलम 3 व 5 मध्ये त्या अनुषंगाने दुरुस्ती होणेबाबतचा अर्ज दिला आहे.

3. अर्जास प्रतिवादीने दिलेल्या म्हणण्यात शिवाजी हा वादीचा भाऊ असून त्याची माहिती वादीस असतांनाही जाणीवपुर्वक प्रस्तुतचा अर्ज दिलेला नाही. सबब नामंजुर करावा या आशयाचे म्हणणे दिले आहे.

4. वादी तर्फे श्री. एस. आर. मेहता व प्रतिवादी तर्फे श्री. पी. आर. मेहता यांचा युक्तीवाद ऐकला. दावा दाखल करतेवेळी वादीने शिवाजी या अज्ञान भावाचे नांव दाव्यात नमूद केलेले नव्हते. दावा वाटपाचा आहे. शिवाजी हा यातील वादी 1, 2 व 4 यांचा भाऊ व वादी नंबर 3 व प्रतिवादी 1 यांचा मुलगा आहे. वाटपाचे दाव्यात त्याचा समावेश असणे आवश्यक आहे. अदयाप दाव्याची चौकशी सुरु झालेली नाही अशा परिस्थितीत त्यास समावेशीत केलेस प्रतिवादींवर अन्यायकारक होत नाही. वाटपाचे दाव्यात सर्व पक्षकार समावेशीत असणे गरजेचे आहे त्या कारणाने प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणे न्यायोचित होईल.सबब आदेश.

<u>आ दे श</u>

(1) दुरुस्ती अर्ज निशाणी 34 मंजुर करणेत येतो.

(2) वादीने प्रस्तावित दुरुस्ती व त्याबाबतची पुर्तता मुळ दाव्याचे कामी सत्वर करावी.

( नि. ग. गोसावी )

दि. 01/04/2015. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, <u>माढा</u>.